# नियमित दिवाणी मुकदमा क्र. १२७/१५ मधील निशाणी क्र. ५ वर आदेश

१. सदरचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार प्रतिवादीविरूध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, शहर पंढरपूर येथील सि.स.क्र. ४३२५ क्षेत्र ८३.०६ चौ.मी मधील १८ खण पत्र्याची इमारतीबाबत प्रस्तुतचा दावा व अर्ज वादींनी दाखल केला आहे. सदर मिळकतीबाबत वादींनी प्रतिवादीविरूध्द नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६१/९८ चा दावा दिवाणी न्यायाधीश, व. स्तर. यांच्या न्यायलयात दाखल केला होता. त्यानंतर सदर दाव्याला नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ असा नवीन नंबर देण्यात आला. सदरचा दावा वादींनी निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केला होता. तसेच त्या दाव्यामध्ये प्रतिवादीने अज्ञार्थी मनाई हुकूमाकरीता प्रतिदावा दाखल केला होता. त्यानंतर सदर नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील दावा मंजूर करण्यात आला व प्रतिदावा नामंजूर करण्यात आला. त्यानंतर वादींनी सि.स.क्र. ४३२५ च्या मिळकतीच्या उताऱ्यास स्वत:चे नाव दाखल करण्यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यानंतर दि. २३/०३/२०१४ रोजी सदरची नोंद प्रमाणित झाली. सदर प्रकरणातील प्रतिवादी हुकूमानाम्याचा भंग करून वादींच्या शांततापुर्ण कब्जेवहिवाटीस अडथळा निर्माण करू लागल्याने वादींनी नियमित दरखास्त क्र. ३३/०९ दाखल केली होती. सदर दरखास्तीमध्ये प्रतिवादी हजर होवून हुकूमनाम्याचा भंग केला नसल्याबाबत बचाव घेतल्यामुळे सदरची दरखास्त निकाली काढण्यात आली.

२. सदर अर्जातील पुढील कथन असे आहे की, सदर प्रकरणातील प्रतिवादीचे नाव अर्जात नमूद मिळकतीच्या कागदोपत्री दाखल असल्यामुळे अर्जात नमूद मिळकतीमधून हाकलून लावण्याच्या उद्‌देशाने प्रतिवादी अर्जात नमूद मिळकत हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्या उद्‌देशाने प्रतिवादीने दि. ०५/०३/२०१५ रोजी रात्री दोन इसमांना अर्जात नमूद मिळकत दाखविली. त्यावेळी इच्छुक खरेदीदारांनी वादींना जागा खाली करण्याची धमकी दिली. सदर कृत्यास प्रतिवादी जबाबदार असून प्रतिवादीच्या सांगण्यानुसार इच्छुक खरेदीदारांनी वादींना धमकी दिली आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी हा बेकायदेशीरपणे अर्जात नमूद मिळकत हस्तांतरीत करण्याची व कब्जा काढून घेण्याची भीती वादींस निर्माण झाली आहे. त्यामुळे वादीस सदरचा दावा व अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सदर दावा प्रलंबीत असताना अर्जात नमुद मिळकतीमधील वादींच्या वहिवाटीस हरकत, अडथळा निर्माण केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत अर्जात नमूद मिळकतीमधील वादींच्या कब्जे—वहिवाटीला प्रतिवादीने हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जाला प्रतिवादीने नि.क्र. १५ ला म्हणणे दाखल करून अर्जातील कथन स्पष्टपणे नाकारलेले आहे. सदर म्हणण्यातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर अर्जात नमूद मिळकत ही दि. ३१/०७/१९३० रोजी रंगनाथ पुरंदरे यांच्याकडून बापू शेटफळकर यांनी खरेदी केलेली आहे. सदर अर्जात नमूद मिळकतीशी वादींच्या पुर्वजांचा कसलाही हक्क हितसंबंध नाही. प्रतिवादीचे पुर्वज बापू शेटफळकर मयत झाल्यानंतर प्रतिवादीचे नाव मिळकतीच्या

हक्कपत्रकी दाखल झालेले आहे. त्यामुळे सदर दाव्यात नमूद मिळकत ी प्रतिवादीचे आजोबा बापू यांची स्वयंसंपादित मिळकत असून सदर मिळकत वारसा हक्काने प्रतिवादीस मिळालेली आहे. नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील निकाल वादींच्या बाजुने लागला असला तरी दि. १०/०१/१९९५ रोजीच्या वाटपपत्राबाबत मा. उच्च न्यायालयामध्ये प्रकरण प्रलंबित आहे. सदर नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मध्ये न्यायालयाने केवळ वादींचा कब्जा धरून कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करू नये असा आदेश पारित केलेला आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादीने वादींना कोणत्याही प्रकारचा हरकत अडथळा न करता देखील वादींनी प्रतिवादीविरूध्द नियमित दरखास्त क्र. ३३/०९ दाखल केलेली होती. सदर दरखास्तीमध्ये प्रतिवादी हजर होवून अर्जात नमूद मिळकत प्रतिवादीच्या मालकीची असल्याचे व प्रतिवादीस विल्हेवाट लावण्याचा अधिकार असल्याचे म्हणणे दाखल केले होते. अर्जात नमूद मिळकतीच्या हस्तांतरणाबाबत न्यायालयाचा आदेश नसताना देखील वादींनी त्याबाबतची नोंद उताऱ्याला दाखल करून घेतलेली आहे. सदर दाव्यास व अर्जास कोणतेही कारण घडले नाही. सदर अर्जात नमूद मिळकत ही प्रतिवादीच्या वाडवडिलार्जित मालकी वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकत हस्तांतरण करण्याचा प्रतिवादीस पुर्ण अधिकार आहे. त्यामुळे अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश मिळण्यास वादी पात्र नाहीत. तसेच अर्जात मागणी केल्याप्रमाणे तात्पुरता मनाई आदेश पारित केल्यास प्रतिवादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची प्रतिवादीने विनंती केली आहे.

४. सदर प्रकरणातील अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेऊन सदरचा अर्ज निकाली काढण्याकरीता मी खालील मुद्दे विचारात घेतलेले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | अर्जात नमुद मागणीबाबत प्रथमदर्शनी केस वादींच्या लाभात असल्याचे वादी सिध्द करतात का ? | : | .. होय. |
| २ | अर्जात नमुद मागणीबाबत न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे वादी सिध्द करतात का ? | : | .. होय. |
| ३ | सदरचा अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे अपरिमीत हानी होणार असल्याचे वादी सिध्द करतात का ? | : | .. होय. |
| ४ | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

५. सदर प्रकरणामध्ये वादींतर्फे विद्वान वकील श्री. एस. आर. जोशी यांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणातील प्रतिवादी व प्रतिवादीतर्फे वकील गैरहजर असल्यामुळे प्रतिवादीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आलेला नाही. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीता</u>** :—

सदर मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे कारणमीमांसेकरीता व निष्कर्षाकरिता सदर मुद्दे एकत्रीत घेण्यात आलेले आहेत.

६. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरून आणि वादीतर्फे विद्वान वकिलांच्या युक्तिवादावरून सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदरचा दावा वादींनी केवळ निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये वादींनी सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादीविरूध्द तात्पुरता मनाई आदेश पारित करण्याची विनंती केली आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादीने <u>नि.क्र. १५</u> ला कैफियत व म्हणणे दाखल करून दाव्यामधील व अर्जामधील कथन नाकारलेले आहे. सदर प्रतिवादीच्या म्हणण्यामधील कथनावरून स्पष्ट होते की, वादींनी प्रतिवादीविरूध्द नियमित दिवाणी मुदकमा क्र. ६५/०४ चा दावा निरंतर मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला होता. तसेच सदर नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मध्ये प्रतिवादीने अज्ञार्थी मनाई हुकूम पारित करण्यासाठी प्रतिदावा दाखल केला होता. सदर नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील दावा मंजूर करण्यात आलेला असून प्रतिदावा नामंजूर करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणातील वादींनी <u>नि.क्र. ४</u> सोबत अर्जात नमूद मिळकतीचा उतारा दाखल केलेला असून सदर उताऱ्यामध्ये मालक सदरी प्रतिवादीचे नाव दाखल असल्याचे व नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील आदेशाची नोंद असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

७. तसेच सदर प्रकरणातील वादींनी नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील न्यायनिर्णयाची सहीशिक्याची नक्कल नि.क्र. ४ सोबत दाखल केलेली आहे. सदर नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील न्यायनिर्णयावरून स्पष्ट होते की, प्रतिवादीने पंढरपूर येथील सि.स.क्र. ४३२५ क्षेत्रफळ ८३.६ चौ.मी. मधील वादींच्या वहिवाटीस हरकत अडथळा करून असा कायमचा मनाई हुकूम पारित झालेला आहे. सदर न्यायानिर्णयामधील निष्कर्षावरून प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, सदर अर्जात नमूद मिळकतीमध्ये वादींची वहिवाट असल्याचे वादींनी सिध्द केल्याने न्यायालयाने निरंतरचा मनाई हुकूम पारित केलेला आहे. त्यामुळे सदर प्रकरणात दाखल कागदपत्रावरून व नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील न्यायनिर्णयावरून सद्य परिस्थितीमध्ये अर्जात नमूद मिळकतीमध्ये वादींची वहिवाट असल्याचे वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. त्यामुळे याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, अर्जात नमूद मिळकतीमध्ये वादींची वहिवाट असल्याचे वादींनी प्रथमदर्शनी सिध्द केलेले आहे. तसेच सदर प्रकरणात दाखल कागदपत्रावरून व नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील न्यायनिर्णयावरून न्यायाचा समतोल देखील वादींच्या बाजुने असल्याचे वादींनी सिध्द केलेले आहे. सदर प्रकरणातील प्रतिवादीने अर्जात नमुद मिळकत स्वत:च्या मालकीची असल्याने सदर मिळकत हस्तांतरण करण्याचा अधीकार असल्याचे कथन केलेले आहे. सदर प्रकरणात वादींनी नि. क्र. ४ सोबत दाखल केलेल्या नियमित दिवाणी मुकदमा क्र. ६५/०४ मधील न्यायनिर्णयावरून प्रथमदर्शनी अर्जात नमुद मिळकत प्रतिवादीच्या मालकीची असल्याचे दिसुन येत नाही. तसेच अर्जात नमुद मिळकत प्रतिवादीच्या मालकीची आहे किंवा नाही ही बाब प्रकरणातील पक्षकारांनी पुरावा दाखल केल्यानंतर स्पष्ट होणार आहे. त्यामुळे

सदर प्रकरण प्रलंबीत असताना प्रतिवादीने मिळकतीचे हस्तांतरण केल्यास अथवा वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा निर्माण केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार असल्याची शक्यता असुन प्रकरणामध्ये गुतांगुत वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर प्रकरण प्रलंबित असताना प्रतिवादीने वादींना हरकत अडथळा निर्माण केल्यास व मिळकतीमधून हाकलून लावण्याचा प्रयत्न केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत अर्जात नमुद मिळकती मधील वादींच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादीने हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई हुकूम पारीत केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अपरिमीत हानीचा मुद्दा देखील वादींच्या बाजुने असल्याचे वादींनी सिध्द केलेला आहे. त्यामुळे वर नमूद चर्चेवरून आणि सदर प्रकरणातील कागदपत्रावरून माझे असे मत झाले आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यासाठी लागणारे घटक प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल आणि अपरिमीत हानीचा मुद्दा वादींच्या बाजुने असल्याचे वादींनी सिध्द केलेले आहे. त्यामुळे मी **मुद्दा क्र. १ ते ३** ला **'होकारार्थी'** निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता** :—

८. वर नमूद चर्चा व सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रांवरून स्पष्ट होते की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ खालील तरतुदींनुसार तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यासाठी लागणारे महत्वाचे घटक

वादींनी सिध्द केलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. नि.क्र. ५ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकतीमधील वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा, आक्षेप, व्यत्यय, बोजा निर्माण होईल अशी कृत्ये प्रतिवादीने स्वत: अगर इतरांमार्फत करू नये असा तात्पुरता मनाई आदेश पारित करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात आला.

सही/—

दिनांक — १९/०६/२०१५

( शि. म. गौरगोंड )

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर.